**किमती दाद**

मला "कै. सौ. वत्सलाबाई पुरस्कार" यंदाच्या "सवाई" मध्ये प्रदान करणार असल्याचं मंडळाच्या विश्वस्तांनी कळवलं आणि भीमसेनजी आणि वत्सलाबाईंच्या सहजीवनातील मी पाहिलेल्या, अनुभवलेल्या काही आठवणी पुन्हा ताज्यातवान्या झाल्या.

कै. सौ. वत्सलाबाई भीमसेन जोशी या केवळ गृहकृत्यदक्ष पत्नी नव्हत्या. भीमसेन जोशी, ही संस्था म्हणण्यापेक्षा, या संस्थानाचा कारभार त्यांनी अत्यंत कर्तबगारीने सांभाळला. भीमसेनजींसारख्या  मनस्वी आणि कलंदर व्यक्तिमत्त्वाला त्यांनी कधी चुचकारून तर कधी दटावून घाट दिला. भीमसेनजींच्या, मग ती त्यांची जीवनशैली असो की गायनशैली, एखादा विवादी स्वर लागला तरी त्यांचा रोष पत्करूनही त्यांनी अत्यंत थंडपणाने आणि निर्भयतेने नेहमीच आपली खरी प्रतिक्रिया व्यक्त केली व अनेक बिकट प्रसंगांना त्या सामोऱ्या गेल्या. हे या कुटुंबाचे आप्त आणि जिवलग जाणतातच. पण अगदी लहानपणापासून त्यांच्यात आणि माझ्यात एक सांगीतिक संदर्भ असलेला दुवा होता असं मला वाटतं. तेव्हाच्या गोष्टी आठवताहेत.

काळ १९६० च्या अलीकडे पलीकडे. माझे वडील म्हणजे वामनराव देशपांडे. आमची मुंबईची वाळकेश्वरची वास्तू वेगवेगळया घराण्यांच्या गायकांच्या वास्तव्यांनी गजबजलेली असायची. जयपूर घराण्याइतकाच त्यांचा किराणा घराण्याशी संबंध म्हणण्यापेक्षा नातेसंबंध. वामनराव सुरेशबाबूंचे शिष्य. हिराबाई, बसवराज यांचं घरी येणं-जाणं असायचं आणि भीमसेनजींनी पुण्यातला रियाज केला तो, माझे काका, आयुर्वेदाचार्य कै. पांडुरंगशास्त्री देशपांडे, यांच्याकडे. माझे चुलत काका, डॉ. नानासाहेब देशपांडे, हे सवाई गंधर्वांचे जावई आणि शिष्य. त्यामुळे भीमसेनजींचे आणि बहुतेक वेळा त्यांच्याबरोबर कै. सौ. वत्सलाबाईंचेही वास्तव्य मुंबईला आमच्या घरी असायचे व हे कुणी पाहुणे नसून घरातलीच मंडळी आहेत, असे वाटे.

भीमसेनजींचा तो उमेदीचा आणि संघर्षाचा काळ होता. माझ्या वडिलांच्या सहवासाचे निमित्त होऊन किराणा घराण्याच्या स्वरभारानी नत होऊन गाताना जमिनीला लागणारं त्यांचं मस्तक, जयपूर घराण्याच्या लयीच्या पेचदार अंगानी उन्नत होऊ लागलं होतं. हे घडवून आणण्यात वत्सलाबाईंची डोळस योजकता होती. आमच्या घरी, तेव्हा वडिलांना चालू असलेल्या कै. मोगुबाई कुर्डीकरांच्या गायनाच्या तालमीचे वातावरण असायचे. वत्सलाबाई घरी असल्या की तंबोरा काढून वामनरावांच्याकडून त्या बंदिशी आणि त्यांची गायकी म्हणवून घ्यायच्या आणि स्वतःही हैदराबादच्या शब्बूखांकडून घेतलेल्या बंदिशी वामनरावांना ऐकवायच्या. हे सर्व भीमसेनजींच्या कानावरही पडतच असे.

'बतियां दुरा' ही शुद्ध कल्याण रागातली बंदिश भीमसेनजींनी वामनारावांकडूनच घेतली होती आणि त्याची एच, एम. व्हि. ची ७८ आर. पी. एम. ची तबकडी तेव्हा फारच लोकप्रिय झाली होती. एकदोनदा वामनरावांनी घरीच वत्सलाबाईंना गायलाही बसवलं होतं हे आठवतंय. आवाका छोटा असला तरी स्वच्छ आणि नेमकं होतं त्यांचं गाणं. अशाच एका मुक्कामी वामनराव भिमासेनाजींना म्हणाले 'आमच्या गुरुजींना (म्हणजे मोगुबाईंना) तुमचं गाणं ऐकवूया'. भीमसेनजींच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह साकार होण्याआधीच वत्सलाबाई उत्साहाने म्हणाल्या, 'आजच हे होऊन जाऊ द्या'. मोगुबाईंच्या त्या छोटेखानी खोलीत! भीमसेनजी जमून

पूरिया गायले. एवढ्या लयकार मोगुबाई, भीमसेनजींचं गाणं कसं ऐकताहेत या औत्सुक्यानं गाणं चालू असताना वामनराव आणि मोगुबाईंना न्याहाळत असलेल्या वत्सलाबाई आजही मला आठवताहेत.

केसरबाई केरकरांचा मुंबईत कार्यक्रम असला की आवर्जून वत्सलाबाई भीमसेनजींना घेऊन मुंबईला येणारच. पण हे सर्व स्वतःपेक्षा त्या भीमसेनजींच्यासाठी करताहेत असं वाटे. भीमसेनजींची सांगीतिक प्रतिभा बहुअंगाने फुलावी यासाठी त्या कार्यरत आहेत असं वाटे. त्याकाळी भीमसेनजींचं कलकत्याला येणं-जाणं सुरु झालं होतं. तिथे काय किंवा इतर गावी सुद्धा काय त्या आवर्जून जायच्या. भीमसेनजींनी इतर लोकांचं चांगलं गाणं ऐकावं आणि त्या गुणांचं आपल्या गायकीत कलम करून लावावं ही त्यांची अव्यक्त इच्छा असायची.

एकीकडे अमीरखांच्या बिलंपतीच्या गुणाची वत्सलाबाई करत असलेली तारीफ आणि ते मैफलीला किती योग्य- अयोग्य आहे याचा भीमसेनजी करत असलेला प्रतिवाद याची थोडीशी विवादाकडे झुकणारी वामनराव, वत्सलाबाई आणि भीमसेनजी यांच्यात झालेली चर्चा मला थोडी थोडी आठवते आहे.

दोन-तीन तरी प्रसंग मला असे आठवताहेत की कुमारजी आणि भीमसेनजी त्या दोन-तीन दिवसात घरी एकत्र होते. एकदा कुमारजी घरी गायला बसले होते, गाणं ऐकल्यावर माफक मद्यपान चालू असताना भीमसेनजी वामनरावांच्या उपस्थितीत कुमारजींना सहानुभूतीने म्हणाले, "मी 'पिया तो' म्हटल्यावर (काफी रागामधल्या ठुमरीच्या या शब्दाचा प्रियकर असाच अर्थ त्यांना अभिप्रेत होता), लोकांनी मनात 'मानत नाही' म्हणावं, अशीच माझी इच्छा असते. कुमार! तुझं तसं नसतं. हे चुकीचं आहे. लोकांना असं ऐकवणं बरोबर नाही. हे तुझं गाणं मी आणि वामनराव ऐकू. "
कुमारजींनी अत्यंत शांतपणे आणि क्षमाशीलतेने हे विधान ऐकून घेतलं होतं.
वत्सलाबाई म्हणत होत्या, "त्यांनी लोकप्रियच झालं पाहिजे हा का तुमचा हट्ट?"
आमच्या पुण्याच्या घरी एकदा सौ. वसुंधरा ताई कोमकली (कुमारजींच्या पत्नी) गायला बसल्या होत्या आणि कुमारजीही नंतर गायले. तेव्हाही, वत्सलाबाई कुमारजींच्या पाया पडल्या होत्या. त्यावेळी आपल्या आदराचं मूक प्रतिक म्हणून कुमारजींना त्यांनी चाफ्याचं फूल दिलं होतं. ही आठवण आजही मनात घर करून राहिली आहे.
याउलट भीमसेनजींची शुद्ध कल्याणची एल. पी. ऐकून कुमारजी म्हणाले होते, त्यांचेच शब्द उद्धृत करतो आहे," सवाई गंधर्वांचं गाणं भीमप्पा समजून आणि सुधारवून गातो आहे. फार छान!"

घरात 'घरंदाज गायकीचं' वातावरण. (मौज प्रकाशनानं याच नावानं १९६२ साली प्रकाशित केलेला हा ग्रंथ अनेक भाषांत अनुवादित होऊन तिसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर आहे.) घराणी म्हणजे वेगवेगळया सौंदर्यशास्त्रीय दृष्टीकोनांचे सातत्य असते, त्यांचे काही अंतर्गत कायदे असतात, याचं प्रथम सूतोवाच करणारा, आणखी बरंच काही सामावून असलेला हा ग्रंथ सिद्ध होताना, त्या काळी मौजच्या गोतावळयात असणाऱ्या बहुतेक कवी-साहित्यिकांसाठी आणि वेगवेगळया घराण्यातील गायकांसाठी, वामनराव वाचनाच्या फैरी घडवून आणायचे. त्यावरच्या उत्कट प्रतिक्रिया, क्रिया; विशेषतः गायकांच्या, गाऊनच व्यक्त व्हायच्या.

या सर्व बैठकींना, विशेषतः किराणा आणि जयपूर घराण्यांच्या या ग्रंथातल्या प्रकरणांच्या वाचनांमध्ये भीमसेनजींपेक्षा वत्सलाबाईंचाच सहभाग आणि त्यांची जिज्ञासा मला स्पष्ट आठवते. असं वाटे,

त्यांना आतून खरोखरच चांगल्या संगीताची ओढ होती. पण ते समजून मी स्वतःच साकार करणार अशी हाव नव्हती. स्वतःतल्या कलाकाराची कुठल्याही कारणांनी का असेना त्यांनी उपेक्षा केली असली तरी त्या 'सुनकार' खऱ्या, 'ऐकणाऱ्या'.

सवाई गंधर्व पुण्यतिथीच्या शेवटच्या तीन 'काळ''रात्री असोत किंवा वर्षानुवर्षे, शहरोशहरी, भीमसेनजींचा सहभाग असलेली संगीत-संमेलने असोत, त्यातल्या सर्व कलाकारांचे गाणे मनापासून ऐकण्याचे आणि त्यातले बरे वाईट जोखण्याचे साहस आणि सद्भाव त्यांच्यामध्ये होता. हे सर्व गुण भीमसेनजींच्या गाण्यात सामावून, फुलून यावेत यासाठीच जणू वत्सलाबाई हे सर्व करत होत्या, असं असेल अथवा नसेलही. पण त्यांचा हा संगीतलोलुपतेचा गुण भीमसेनजींना माहित होता, या गुणाची त्यांना कदर होती. अशी 'किमती दाद' देणाऱ्या व्यक्तीच्या नावाने हा पुरस्कार मिळतो आहे याचा मला अभिमान आणि आनंद आहे.

- सत्यशील देशपांडे